## महाराष्ट्रेतिहासमर्थ
# राजवाडे इतिहासस्वरूप बनले !

### १

( लेखक:— आबा चांदोरकर )

" ब्राह्मण्य रक्षावें आदरें "

—श्रीसमर्थ

ब्राह्मण्याच्या लक्षणांत निष्कामपणें अध्ययनाध्यापन करणें अथवा ज्ञानार्जन, ज्ञानसंवर्धन व ज्ञानदान करणें हें लक्षण मुख्य आहे; त्याबरोबर शम, दम, तप, कष्टाबद्दल बेफिकीरी, सर्वभूतहितरतता, सत्य, स्वाध्यायाभ्यास इत्यादि सात्विक लक्षणें हि पूरक ह्मणून सांगितलेलीं आहेत. प्राचीनकाळीं असें ब्रह्मनिष्ठ ब्राह्मण पुष्कळ होऊन गेले. परकीय म्लेच्छांच्या तावडींत आर्यावर्त गेलें असतां असल्या ब्राह्मणांची संख्या कमी झाली, पण, मराठी साम्राज्यांत ती पुन्हां वाढीला लागली. इतिहासाची पुनरावृत्ति होते, असें ह्मणतात; त्यास अनुसरून स्वराज्य नष्ट झाल्यानंतर गेल्या सव्वाशें वर्षांत या संख्येस पुनरपि ओहोटी लागली. तथापि, आर्यवर्तावर भगवंताची, जगांतील इतर देशापेक्षां जास्त कृपादृष्टी असल्यानें अशा पतित स्थितींत हि ब्रह्मनिष्ठ ब्राह्मणांची उत्पत्ति अगदीं च नामशेष न होतां, मधून मधून असें पुरुष चमकून जातात.

( २ ) असल्या ब्रह्मविद्वारिष्ठ महापुरुषांचें कार्य वर सांगितलेल्या त्यांच्या लक्षणांत आलेंच आहे. ज्या देशांत असले पुरुष उत्पन्न होतात, त्या देशाला व त्या समाजाला ते ललामभूत बनतात. स्वतंत्र देशांत असल्या महात्म्यांची थोरवी फार गायली जाऊन, जगांतहि त्यांचा बोलबाला होतो ! हें भाग्य परतंत्र राष्ट्रांत जन्मलेल्या वरील कोटीच्या पुरुषांना लाभत नाहीं. परवशता सर्व दु:खांचें मूळ आहे, हें च खरें. परन्तु, एका दृष्टीनें आह्मांस असें वाटतें कीं, असल्या परतंत्र देशांत उपजलेल्या विद्वानांची थोरवी, स्वतंत्र देशांतील पंडितांपेक्षां कांकणभर जास्तच आहे ! कारण, स्वतंत्रदेशीय विद्वानांना आपल्या विद्वत्तेचा प्रसार करण्यास अनेक साधनांची मदत सहज साध्य असते; त्यांचें मायेचें स्वराज्य असतें, योगक्षेमाची काळजी सरकारावर ( किंवा राष्ट्रावर ) सोंपवून त्यांना आपला व्यवसाय करण्यास सवड असते, त्यांच्या रतीभर उद्योगाचा परराष्ट्रांत डोंगरभर गाजावाजा केला जातो, राष्ट्राच्या आनंदकारक परिस्थितीमुळे त्यांना आपला संप्रदाय वाढविता येतो, इत्यादि बरेच फायदे या पंडितांच्या पदरीं ( केवळ त्यांचें श्वसन स्वातंत्र्यांत होत असल्यानें ) पडतात. उलट, पारतंत्र्य स्पृष्ट विद्वानांच्या पदरीं वरील सर्व गोष्टींच्या तंतोतंत विरुद्ध परिस्थिती बांधली जाते. अशाहि स्थितींत त्या परिस्थितीशीं टक्कर देऊन जे महापुरुष आपली कीर्ति अजरामर करतात, त्यांची थोरवी, वर ह्मटल्याप्रमाणें, स्वतंत्रदेशीय पंडितांपेक्षां कांकणभर जास्त नाहीं काय ?

( ३ ) शके १७४० नंतर अशा प्रकारचे जे ब्राह्मण होउन गेले, त्यांत गुरुवर्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचें स्थान बऱ्याच वरच्या पायरीचें आहे. या पुरुषानें आपल्या ६३ वर्षांच्या आयुष्यांत स्वदेशोद्धारक कार्या विरहित यत्किंचितहि काल घालविला नाहीं आणि "कैसी ब्राह्मण्यें जगतील " या चिंतेशिवाय दुसरी चिंता वाहिली नाहीं ! नुसती चिंतनिका न करतां, स्वत: ठरविलेल्या "ब्राह्मण्य जगविण्याच्या " कार्याला त्यांनीं आपल्याला अखंड वाहून घेतलें होतें. वैदिक आर्य-धर्माचा कुरुक्षेत्रावर सांगितलेल्या नारायणीयधर्माचा ऊर्फ कर्मयोगाचा, "राज्य नेलें म्लेंच्छक्षेत्रीं गुरुत्व गेलें कुपात्रीं " अशा वेळीं ज्या महापुरुषानें भगव्या छाटीच्या खालीं देवब्राह्मणांचें स्वराज्य स्थापविलें त्या श्रीसमर्थांच्या महाराष्ट्रधर्माचा, देशांत अनिरुद्ध संचार होणें, ह्मणजे च आमच्या मतें वरील "ब्राह्मण्य " होय. आमच्या "ब्राह्मण्य " शब्दाचें हें लक्षण आहे. तेंच खरें ब्राह्मण्य, कीं ज्यांत वज्रधर इन्द्र व दन्डधर वशिष्ट, अथवा योगेश्वर श्रीकृष्ण व धनुर्धर अर्जुन, विवेक वैराग्य समर्थ श्रीरामदास व औरंग्या पापी बुडवून मोडलीं क्षेत्रें पुन्हां प्रस्थापित करणारा शिवराय, अशा ब्रह्मनिष्ठ व वीरश्रेष्ठ पुरुषांची जोडी उत्पन्न होऊन राष्ट्राचें ऐहिक व पारलौकिक परम कल्याण साधलें जातें ! या व्यापक अर्थानें आह्मी "ब्राह्मण्य " या श्रेष्ठतम शब्दाकडे पाहतों; आणि त्या दृष्टीस अनुसरूनच, गेल्या तीन तपांत ज्या पुरुषानें हें ब्राह्मण्यरक्षणाचें कार्य अत्यंत निष्कामबुद्धीनें आमरणांत केलें, त्या गुरुवर्य राजवाड्यांचें कीर्तन करतों !

( ४ ) गुरुवर्यांनीं ब्राह्मण्यरक्षणार्थ काय केलें असा प्रश्न टाकण्यापेक्षां, त्यांनीं काय करावयाचें बाकी ठेवलें असा प्रश्न विचारणें सयुक्तिक होईल ! त्यांनीं महाराष्ट्राचा अज्ञात इतिहास उजेडांत आणला, त्यांनीं जाणून बुजून खोटा इतिहास लिहिणाऱ्या परकीयांचा खरपूस समाचार घेतला, त्यांनीं असत्य परकीय इतिहासकारांच्या ओंजळीनें पाणी पिणाऱ्या द्यामुख्यायणी " स्वदेशावमानी इतिहासकारांची " खडकून हजेरी घेतली, त्यांनीं भाषांतर मासिकाच्या द्वारें जगांतील स्वातंत्र्यइच्छा पूरक वाङ्मय देण्याचा उपक्रम केला, त्यांनीं मऱ्हाठी भाषेचा नाना प्रकारचा वाग्विलास गुप्त तळघरांतून व बळदांतून हुडकून काढून जनतेसमोर मांडला, नाना शास्त्रांचें अवगाहन करून व त्यांची मांडणी मराठीतून करून त्यांनीं आपला " मऱ्हाठा बोल पैजेनें जिंकून अमृतापेक्षां सरस " ठरविला, त्यांनीं या मराठीवरील आत्यंतिक प्रेमामुळें तिचा उगम वेदपूर्वकालापर्यंत लाविला, त्यांनीं प्राचीन भारतीय समाजशास्त्राचें आविष्करण केलें, त्यांनीं आर्यांच्या मूलस्थानावर कश्यप ऋषीच्या नांवाच्या आधारानें प्रकाश पाडला, भौतिक शास्त्राच्या अज्ञानामुळें आमचें स्वराज्य गेलें व तें पाहिजे असल्यास त्या शास्त्राचें अध्ययन स्वराज्येच्छु भारतीयांनीं करणें अवश्य आहे असें ठरवून त्याप्रीत्यर्थ आपल्या फाटक्या चंचीतून त्यांनीं कांहीं ठोकळ रक्कम भौतिकशास्त्र्यांच्या हवाली केली, सांप्रतची प्रजा नि:सत्व बनत चालल्याचें आढळून आल्यामुळें त्यांनीं आरोग्याची काळजी घेणारी व त्या दिशेनें प्रयत्न करणारी संस्था स्थापिली, इतिहासाचा अभ्यास करणाऱ्यांना त्यांनीं एकत्र जमवून आपलें कार्य त्यांच्यापुढें आदर्शवत् ठेविलें, इत्याद्यनेक उद्योग व यंत्रणा, कीं, ज्या करण्यास अनेक मोठमोठ्या व्यक्तींचीं अनेक वर्षें खर्ची पडलीं असतीं, त्या त्यांनीं साऱ्या तीन तपांच्या अवधींत पार पाडल्या हें सत्य आहे ! पण, केवळ तेवढ्या च मुळें त्यांना लेखाच्या शिरोभागीं लिहिलेलें " महाराष्ट्रेतिहाससमर्थ " हें पद प्राप्त झालेलें नाहीं. कारण कीं, वरील उद्योगां पैकीं एक एक स्वतंत्र उद्योग करणाऱ्या व्यक्ति महाराष्ट्रांत होऊन गेल्या आहेत व सांप्रत विद्यमानहि आहेत; फार तर कार्य, पण, याच्यापुढें जाऊन आह्मी हें हि कबूल करण्यास तयार आहों, कीं, हे इतके उद्योग करणारा अगाध बुद्धिमत्तेचा एकादा पुरुष शके १७४० ते १८४० पर्यंतच्या एका शतकांत होऊनहि गेला असेल. परन्तु, या सर्व गोष्टींचा राष्ट्र प्रपंच चालूं असतां

त्या सर्व प्रपंचांत "ब्राह्मण्य" तगविण्याचा व जगविण्याचा अखंडित व अत्रुटित असा त्यांनीं जो प्रयत्न चालविला होता, तो तशातऱ्हेनें चालविणाऱ्या व्यक्ति वा एक पुरुष गेल्या शतकांत कितीसे निघाले असतील बरें? आणि केवळ तेवढ्यासाठीच ह्मणून, अशीं, त्यांना "महाराष्ट्रेतिहाससमर्थ" असें ह्मटलें आहे!!!

(५) महाराष्ट्रेतिहास ह्मणजे महाराष्ट्रधर्म; महाराष्ट्रेतिहासांत जर महाराष्ट्रधर्माचा समावेश होत नसेल, तर तो महाराष्ट्रेतिहास नव्हे! महाराष्ट्राला, या महाराष्ट्रधर्माची ओळख, चाफळ खोऱ्यांतील शिंगणवाडीच्या औदुंबराखालीं करून दिली गेली! कर्माच्या ठिकाणीं कुशलता (कौशल्य) याचा अर्थ असा, कीं, जें कर्म करावयाचें तें ज्ञानमूलक असावें, तें भक्तिप्रधान असावें, तें निष्काम असावें; तसेंच तें आर्यसंस्कृतिरक्षक असून पुष्टिकारक व तुष्टिकारकहि असावें; असें कर्माचरण ह्मणजे श्रीकृष्णाचा कर्मयोग होय व तोच समर्थांचा महाराष्ट्रधर्म होय. कालचक्राच्या फेऱ्यामुळें व आचरणाऱ्यांच्या अज्ञानामुळें हा योग मधून मधून लुप्त होतो, परन्तु, त्याला कोणी प्रज्वलिता अवतारी पुरुष भेटला ह्मणजे तो पुनरपि प्रज्वलित होतो! प्राचीन काळ सोडून अलीकडच्या काळाकडे दृष्टि फेकल्यास, महाराष्ट्रांत गेल्या सातशें वर्षांत अशा ब्राह्मण्याचे प्रज्वलित आमच्या दृष्टीस फक्त दोनच पडतात. तुंगभद्रेवर विद्यानगर स्थापणारा विद्यारण्य व रायगिरीवर हुरमुजी छाटी फडफडविणारा श्रीसमर्थ रामदास गोसावी! त्या नंतर महाराष्ट्र साम्राज्याचा काळ वगळून अलीकडील आंग्लाईच्या काळाकडे पाहिल्यास समसूम दिसतें. या काळांत वरील जोडीच्या सारखे राष्ट्रपुरुष महाराष्ट्रांत झाले नाहींत. गेल्या ५०।६० वर्षांत, वरील ब्रह्मनिष्ठ पुरुषांच्या असनाच्या थोडे फार जवळ ज्याचें आसन मांडता येईल, असा एक राष्ट्रसूत्रधार होऊन गेला खरा, पण त्याच्या शिवाय दुसरें नांव ध्यानांत आणण्याचा प्रयत्न केल्यास गुरुवर्य राजवाडे यांचें नांव चटकन पुढें येतें! त्यांच्या चरित्राकडे ज्यांचें सूक्ष्म लक्ष्य असेल, त्यांना हें आमचें ह्मणणें पटावयास विशेष अडचण पडणार नाहीं.

(६) त्यांचें चरित्र श्रीसमर्थप्रतिपादितमहंतलक्षणमार्गानुसारी होतें, हें त्यांच्या मित्रांना व अनुयायांना सांगण्याची विशेष जरूरी नाहीं. अलीकडील त्यांच्या चहाल्या तरुण पिढीस त्यांचें तितकें ज्ञान नसावें, ह्मणून ते येथें अगदीं थोडक्यांत दिलें आहे (तें संक्षेपानें वर चौथ्या परिच्छेदांत आलेच आहे.)

(७) गुरुवर्यांचा जन्म, शके १७८५ आषाढ शु॥ अष्टमीस झाला व निधन, शके १८४८ मार्गशीर्ष वद्य द्वादशीस झालें. हा काल इंग्रजी तारीख महिना साल या मधून मुद्दाम देत नाहीं; कारण गुरुवर्यांना अशी इंग्रजी कालगणनपद्धति पसंत नव्हती! त्यांच्या सर्व लिखाणांत देशी शककालपद्धतीच अवलंबिलेली असे. अशल्या सामान्य बाबींतहि त्यांनीं स्वत्वाचा अभिमान राखला होता! त्यांच्या पितामहानें स्वराज्याच्या पडत्या काळीं लोहगडची किल्लेदारी केली होती. लहानपणीं वडील वारल्यानें त्यांचें शिक्षण वगैरे त्यांच्या चुलत्यानें केलें. प्राथमिक शिक्षण वडगांवीं होऊन इंग्रजी शिक्षण पुण्याच्या तत्कालीन नांवाजलेल्या तीन चार शाळांतून झालें, आणि पाठशाळेतील अभ्यासक्रम एल्फिन्स्टन व डेक्कन कॉलेजांतून संपला. ते आपल्या वयाच्या १८ व्या वर्षी मॅट्रिक होऊन २५ च्या सुमारास बी. ए. झाले. बी. ए. होण्यापूर्वी त्यांनीं डेक्कन कॉलेजांतील अनेक विषयांवरील ग्रंथांचें सूक्ष्म परिशीलन करण्यांत व शरीरयष्टी मजबूत करण्यांत कांहीं दिवस घालविल्यानें, त्यांना बी. ए. होण्यास थोडासा उशीर झाला; पण त्यांनीं त्याचा वचपा पुढें काढून ३।४ महिन्यांतच बी. ए. चा अभ्यास संपविला. व आपल्या बुद्धीची चुणूक दाखविली! निबंधमालेनें त्या वेळच्या तरुण पिढीवर जो एक प्रकारचा उपकार करून ठेवला, त्याचे अंशभाक् गुरुजीहि झाले होते. इंग्रजी भाषेंत विचार व उच्चार करण्याची त्यांची संवय धाकट्या शास्त्रीबोवांच्या अंजनानें नाहींशी झाली! त्याचा परिणाम इतका झाला कीं, तेव्हांपासून शेवटपर्यंत त्यांनीं मराठी भाषेखेरीज दुसऱ्या कोणत्याहि भाषेंत आपली लेखणी चालविली

नाहीं. त्यामुळें जागतिक पंडितांच्या दृष्टीनें ते अज्ञातावस्थेंत राहिले. जगांत जे प्रख्यात पंडितश्रेष्ठ असतील त्यांच्या मांडीला मांडी लावून बसण्याची ज्याची योग्यता इतकेंच काय, पण कांहीं कांहीं बाबतींत तर असल्या परदेशी पंडितांनीं ज्याच्या पायापाशी बसून धडे घ्यावेत अशी ज्याची विशाल बुद्धिमत्ता, त्या महापुरुषानें आपल्या मायभाषेवरील प्रेमामुळें महनीय स्वार्थत्याग करून मुद्दाम च वरील प्रकारचा अज्ञातवास पत्करिला आणि आपली प्रतिज्ञापूर्ति केली ! ! या त्यांच्या स्वार्थत्यागाला जें फल येणार तें आणखी एक पिढी गेल्यावर येईल. तथापि त्यांच्या हयातींत तें फल दृग्गोचर होण्यास सुरुवात झाली होती. त्यांचे शोध जाणूं इच्छिणारे व त्यांचे अभ्यास करूं इच्छिणारे परभाषा बोलणारे कांहीं विद्वान गुरुवर्यांच्या प्रतिज्ञेला अनुसरून त्यांची मराठी भाषा शिकले ! !

(८) स्वदेशेतिहासाकडे त्यांचें लक्ष्य कॉलेजांत असतांना च लागलें व त्याला कारण, त्यावेळीं नुकेंच पुढें आलेलें महाराष्ट्रीय काव्येतिहाससंग्रहप्रकाशन होय. बी. ए. होण्यापूर्वी त्यांनीं या विषयाचा अभ्यास चालवून पूर्व तयारी करून ठेविली; पुढें, थोडा काळ शिक्षकाचा पेशा पत्करून त्यांनीं आपल्या खऱ्या कामास हात घातला. एक भारदस्त व लोकजागृति करणारें (भारतवर्ष नांवाचें) मासिक प्रथम त्यांनीं सुरू केलें आणि त्या बरोबरच ऐतिहासिकसाधनांचें संशोधन चालू ठेविलें. त्या संशोधनांत व त्यांच्या प्रसिद्धीकरणांत त्यांचें सर्व आयुष्य व्यतीत झालें. स्वदेश, स्वभाषा, स्वधर्म यांचें ज्ञान, आह्मां मुमूर्षु लोकांना, त्यांनीं या कार्यानेंच करून दिलें, थोडक्यांत सांगावयाचें ह्मटलें, ह्मणजे, त्यांनीं इतिहाससाधनांचे २२ खंड व १० हजार पृष्ठें प्रसिद्ध करून सांप्रतच्या महाराष्ट्रास आपल्या पूर्वस्थितीचें ज्ञान करून दिलें. या खेरीज, मागें सांगितल्या प्रमाणें नाना प्रकारच्या विषयांवर उद्बोधक लिखाणांचा त्यांनीं एक वाङ्मयोदधि निर्माण केला ! वाङ्मयाचा अथवा शास्त्राचा असा बहुधा एक हि विषय राहिला नाहीं, कीं, ज्यांत त्यांनीं शोध करून आपल्या बुद्धीची चमक दाखविली नाहीं ! सांप्रतच्या व भावी अनेक पिढ्यांतील ज्या कोणा विद्वानांना एकाद्या विषयाचें सांगोपांग ज्ञान करून घेऊन एकादा मुद्दा प्रस्थापित करावयाचा असेल, त्यांना, गुरुवर्यांनीं त्या विषयावर आपले कोणते विचार प्रगट केले आहेत व काय निर्णय दिला आहे, त्यांचा शोध अवश्य घ्यावा लागेल !

(९) गुरुवर्यांच्या अगाध बुद्धिमत्तेबद्दल व बौद्धिक कार्याबद्दल, आतांपर्यंत, इतरत्र (व ब्राह्मण पत्रिकेच्या या अंकांतहि) माहिती प्रसिद्ध झालीच आहे; त्यामुळें, त्याची द्विरुक्ति न करतां आह्मी, येथें, त्यांच्या खाजगी वर्तनाची थोडीशी माहिती देतों.

(१०) थोडीशी ह्मणण्याचें कारण, आपलें साद्यंत चरित्र सहसा उजेडांत येऊं नये, अशी त्यांची मनीषा व वागणूक होती; "आपुली स्थिती अनुमाना येवों च नेदी" या रामदासी बाण्यानें ते वागत असत ! ते एके ठिकाणीं फार दिवस रहात नसत; अखंड भ्रमण करून लोक पारखून सोडीत; त्यांत कार्यकर्ते कोण, कार्यनाशी कोण, धट कोण, लंडी कोण, उदार कोण, आपल्या कार्याचे उपयोगी कोण व विरोधक कोण, स्वदेशाभिमानी कोण व स्वदेशावमानी कोण इ. इ. परीक्षण करीत आणि अशा परीक्षून सोडलेल्या तीक्ष्ण बुद्धीच्या सखोल मुमुक्षूंना हाताशीं धरून, त्यांना स्वदेशोद्धारक कार्यांना जुंपून देत ! त्यांच्या भ्रमणांत महंती साक्ष्या दिसून येई. आपल्यास पुढें कोठें जावयाचें, तें स्थळ, ते कोणास निश्चित सांगत नसत व कदाचित सांगितलें च तर त्या स्थळीं जात नसत ! गांवाबाहेर एकांत स्थळीं वास करीत व अशा अखंड एकांतांत ते आपले सिद्धांत प्रगट करीत. "एकांतशिवाय प्राणीयाला बुद्धि कैंची" ! हें रामदासी कोडें त्यांच्याकडे पाहिल्यास सुटत असे. गिरिकंदरें, दरेदकुंडें, गुहा खचाळे त्यांनीं पालथीं घातलीं होतीं; हिंदुस्थानांतील प्रख्यात स्थळें त्यांनीं पाहिलीं होतीं; महाराष्ट्र तर सर्व धुंडाळला होता ! त्यांची वर्तणूक अत्यंत निस्पृहपणाची

होती. ते आपल्या मित्राच्या घरीं हि तीन दिवसापेक्षां जास्त दिवस रहात नसत. स्वहस्तें " चरु " तयार करीत, साधा पांढरा रुमाल, साधा कोट, साधे दोन सदरें, साधें उपरणें व दहा वारी साधें धोतर, हा त्यांचा नेहमींचा पोषाक असे, त्यांना तंबाकू व साध्या विड्या लागत; पण व्यसन म्हणून त्यांचा संग्रह ते कधींहि करीत नसत पैशाचा संग्रह तर त्यांनीं कधीं च केला नाहीं; तत्रापि स्वतःच्या योगक्षेमापुरती रक्कम त्यांच्या त्या जीर्ण चंचींत अथवा बटव्यांत मधून मधून दिसे. महिना १० रु० च्या वर त्यांना शरीरपोषणार्थ जास्त रक्कम लागत नसे. प्रवासांत तर कित्येक दिवस त्यांनीं केळीं, चणेकुरमुरे किंवा दुग्धपानावर काढलेले आहेत ! हजारों कोसांचा प्रवास त्यांनीं पायीं केला आहे. पांघरण्याची धाबळी, आंथरण्याचें कांबळें, दोन धोतरें व एक पंचपात्री यांचें गांठोडें काठींत खोंचून, ती काठी खांद्यावर टेकून, पायांत पुणेरी जोडा घालून, " गुंतल्या लोकांस उगविण्याचा " विचार करणारी ती विवेक वैराग्ययुक्त भव्य मूर्ति रस्त्यानें चालत जातांना पुष्कळांच्या पहाण्यांत आली असेल ! महाराष्ट्राबद्दल व महाराष्ट्रीकांबद्दल यांनां सकारण अभिमान होता. हिंदुस्थानांत मराठ्यांनीं कोणतें महनीय काम करून दाखविलें, त्याचें स्पष्टीकरण, त्यांनीं आपल्या खंडाच्या एका प्रस्तावनेंत करून ठेविलें आहे. एका प्रख्यात महाराष्ट्रीय पुढाऱ्याच्या घराच्या दिंडी दरवाज्यावर पुरबिया द्वारपाल पाहून त्यांना वाईट वाटे. ते ह्मणत, " हें पुरबिये लोक भाडोत्री व × × × होत; पेशवाईंतील गृहकलहांत भाग घेणारे गाडदी बहुतेक हे च लोक होते ( उत्तर हिंदुस्थानी रांगडे लोकांचें स्वभाववर्णन अशाच प्रकारें, पूर्वी गोविंदपंत बुंदेले, हिंगणे, राजेबहादूर व पाटील बावा यांनीं केलें आहे ). या पुढाऱ्यास काय मराठा किंवा मावळा जातीचा द्वारपाल मिळाला नाहीं काय ?" असे त्यांचे उद्गार असत ! त्यांचा दृढनिश्चय सर्वश्रुतच आहे. लहानशी गोष्ट; पूर्वीपासून त्यांची दृष्टि थोडीशी मन्द होती आणि अलीकडे तर ती बरीच कमी झाली होती; पण, उपनेत्र लावावयाचें नाहीं, हा निर्धार त्यांनीं अखेरपर्यंत सोडला नाहीं ! नमस्काराचा व्यायाम त्यांनीं कायम ठेवला होता. तरुणांनीं, निदान ब्रह्मचाऱ्यांनीं व्यायाम सतत चालू ठेवावा व कांबळ्यावर निजावें असें त्यांचें सांगणें असे.

( ११ ) त्यांना सुशिक्षित मनाची आवड होती; सुशिक्षित मन, ह्मणजे, सांप्रतच्या आपल्या हीनावस्थेचा विचार करून त्यावर यथाशक्ति उपाय योजणारें मन, अशी ते त्या मनाची व्याख्या करीत सांप्रतच्या शालेय शिक्षणानें व पदव्यांनीं संस्कार पावलेल्या मनास, ते तितकेंसें सुशिक्षित मन म्हणून गणत नसत. शालेय पदव्यांबद्दल त्यांना फारसा आदर नसे. त्यांनीं आपल्या नांवापुढें स्वतःची शालेय पदवी आपण होऊन लावल्याचें आम्हांस स्मरत नाहीं. एवढें च नव्हे तर मोठमोठ्या विद्वान संस्थांनीं त्यांना अर्पण केलेल्या पदव्यांनांहि ते कस्पटाप्रमाणें लेखीत ! काशीच्या भारतधर्म महामंडळानें त्यांनां " पुरातत्त्वभूषण " ह्मणून पदवी अर्पण करून, त्या पदवीचें प्रमाणपत्र त्यांच्याकडे पाठवून दिलें असतां, त्यांनीं ते प्रमाणपत्र व तें ज्यांत आलें होतें तें जस्ती नळकांडें, यांची किंमत सारखी च लेखून त्या पत्रासकट तें नळकांडें भिरकावून दिल्याचें आह्मांस आठवतें ! पदव्या त्यांच्या मागें येत तर ते पदव्यांनां लाथाडीत; त्याचा अर्थ असा कीं, पदव्यामुळें त्यांनां भूषण न येतां त्यांच्या नांवानें पदव्या विभूषित होत ! ते आपला सारा पत्रव्यवहार मोडींत करीत. त्यांचें अक्षर मोठें, सुवाच्य व वळणदार असे. त्यांचा लेख मोत्यांच्या घोसाप्रमाणें दिसे. मोडी, बाळबोध व इंग्रजी तिन्ही लिपींचीं त्यांचीं अक्षरें कित्त्यासारखीं होतीं.

१२ महंताला बाह्यतः हवी असणारी पिसाटवृत्ति हि गुरुवर्यांनीं आपलीशी केली होती ! पण, ती कारणपरत्वें मुद्दाम उत्पन्न केलेली व बरवर दिसणारी होती. खऱ्या कार्यकर्त्याला, स्वतःस विनाकारण चिकटू पाहणाऱ्या उपमर्दापासून दूर राहण्यासाठीं अशी वृत्ति क्वचित्प्रसंगीं दर्शवावी लागते ! अत्यावश्यक कर्तव्याकडे

पुढाऱ्यांचें व समाजाचें दुर्लक्ष्य होत आहे, असें दिसून आल्यामुळें, मनांत उद्भवणाऱ्या विषण्णतेनें हि ही वृत्ति प्रबोधकर्त्यांच्या ठायीं उत्पन्न होते !

(१३) या वृत्तीमुळें त्यांच्या हातून लोकसंग्रह झाला नाहीं, असा आक्षेप त्यांच्यावर घेतला जाई. परंतु, आह्मांस वाटतें कीं, आक्षेपकांनां गुरुजींच्या लोकसंग्रहाचें यथार्थ स्वरूप लक्ष्यांत आलें नसावें ! राजकारणी पुरुषांचा लोकसंग्रह निराळा व गुरुजींसारख्या प्रबोधशक्ति जागविणाऱ्या पुरुषांचा लोकसंग्रह निराळा ! हा सूक्ष्म भेद मनांत वागविल्यास आक्षेपकांनां त्यांचें उत्तर मिळेल असें वाटतें. मठ स्थापून महंती करण्याचें त्यांचें ब्रीदच नव्हतें; आणि कोणत्या महंतश्रेष्ठाची महंतपरंपरा त्याच्या पश्चात् अखंड चालू राहिली आहे ? ते आपला उपदेश देशांत पसरवून देतात; योग्य मनोभूमिकांत तो ठसला जातो, अयोग्य मनांत त्याचा कायमचा प्रवेश होत नाहीं. पाऊस खडकावर पडतो व काळ्या मृत्तिकेच्या क्षेत्रांतहि पडतो, पण, धान्याची घोसदार कणसें पहिल्या ठिकाणीं न उगवतां दुसऱ्या च जागीं उगवतात, हा काय पावसाचा दोष ? सुक्षेत्रांतच बीज फोफावतें ! अशा पुरुषांचा लोकसंग्रह अफाट नसून मोजका असतो व असतो तो कार्यकर्ता असतो !

१४ गुरुवर्यांच्या अंगचें गुणवर्णन आणीक हि करण्यासारखें आहे; पण, तूर्त लेखकांस वेळ नाहीं व संपादकानें दिलेली सवड हि संपली आहे. दासबोधांत प्रतिपादलेली व श्रीसमर्थरामदासांनीं आचरणांत आणलेलीं तत्त्वें व कार्य गुरुवर्य राजवाडे यांनीं आपल्या आयुष्यांत कशीं उतरवून दाखविलीं याचें अत्यंत त्रोटक आख्यापन या टिपणांत करावयाचें होतें, तें केलें आहे. तेवढ्यावरून, त्यांना आह्मीं "महाराष्ट्रेतिहाससमर्थ" असें कां ह्मणतों याची साधारण कल्पना वाचकांनां येईल. "समर्थ" ही पदवी गुरुवर्यांनां आह्मीं कांहीं नवीन शोधून काढिली नाहीं; ती जुनीच आहे; ती, कै. खरेशास्त्री, प्रो. भानु इत्यादि जाणत्यांनीं त्यांना पूर्वी च अर्पण केलेली आहे, आह्मी फक्त त्यांचा मागोवा करीत आहों; आणि सांप्रतच्या काळीं "नाना मंडळें स्थापून नाना सामर्थ्यें वाढविणाऱ्या" या धगधगीत तेजोराशी अशा पुरुषास 'समर्थ' ह्मणावयाचे नाहीं, तर मग कोणास ह्मणावयाचें ?



# ब्राह्मण्याचा सूर्य मावळला !!!

१०

( ले.:— महादेवशास्त्री दिवेकर )

विद्वन् शिरोमणि, इतिहासाचार्य, भाषा व समाजशास्त्रज्ञ, विद्येचा कट्टा उपासक असा आर्यमातेचा पुत्र १९२६ च्या शेवटच्या तारखेस दिवंगत झाला, हें ऐकून प्रत्येक महाराष्ट्रीयाला हळहळ वाटल्यावाचून राहाणार नाहीं. आचार्य राजवाडे म्हणत कीं, " मला आणखी आठ वर्षे जगावयाचें आहे. चार वर्षांत मी भाषाशास्त्रावरचा ग्रंथ पुरा करितो आणि पुढें चार वर्षांत समाजशास्त्रावर ग्रंथ लिहून तुमच्या कार्याला स्मृति तयार करून देतो. " दुर्दैव राष्ट्राचें— महाराष्ट्राचें कीं असा स्मृतिकार त्याला लाभावयाचा नव्हता ! ऋषिवर्य राजवाडे अलीकडे समाजशास्त्रावर लिखाण करीत हे राधामाधवविलास चंपू व महिकावतीची बखर यांच्या प्रस्तावनेवरून सुस्पष्ट होत आहे. त्यांतील विचारसरणी समाज कार्यकर्त्यांना उपकारक झाल्यावांचून न राहणार नाहीं. इतकी ती खोल व गंभीर आहे. भाषाशास्त्र, समाजशास्त्र संशोधन, मराठ्यांचा इतिहास, आणि संस्कृत भाषा इत्यादि क्षेत्रांत जो ब्राह्मण, जो तपस्वीब्राह्मण—आपलें नांव अजरामर करून गेला त्याबद्दल महाराष्ट्राला व हिंदुस्थानाला धन्यता व अभिमान वाटल्यावांचून राहाणार नाहीं. इतका विद्वान, इतका प्रतिभासंपन्न, इतका दांडगा व्यवसायी, इतका त्यागी, एवढा विरक्त आणि त्याप्रमाणें विक्षिप्त पुरुष जगांत उत्पन्न झाला आहे किंवा नाहीं याची शंका वाटते. जगांत विद्वान असतील पण इतका साधा व दरिद्री मनुष्य आढळणार नाहीं. जगांत प्रतिभासंपन्न माणसें असतील परंतु त्यामध्यें एवढा त्याग मुळींच दिसणार नाहीं. जगांत विरक्त माणसेंहि असतील परंतु त्यांत एवढा दांडगा व्यवसायी मिळणार नाहीं. सर्व सद्गुण विश्वनाथपंत राजवाड्यांच्या ठिकाणीं एकवटले होते असा हिरा अशी—जगांतील थोर विभूती महाराष्ट्रानें गमावली याबद्दल अश्रुपूर्ण नयनांनीं महाराष्ट्रीय तिलांजळी देईल यांत शंका नाहीं. आचार्य राजवाडे, पंडित प्रकांड राजवाडे यांच्याबद्दल लिहितांना काय लिहावें व काय लिहूं नये होतें. त्यांचा त्याग, त्यांचें तप, त्यांचा उद्योग, त्यांचा स्वभाव यापैकीं एकेका विषयावर थोडीं टांचणें द्यावयाचीं असें ठरविलें तरी २५।५० पानांचा निबंध होणार आहे. पण या राजवाडे अंकांत राजवाडे हे सर्व श्रेष्ठ ब्राह्मण कसे होते इतकेंच सांगितलें म्हणजे पुरें होईल. विश्वनाथपंत अलीकडे म्हणत कीं, ब्राह्मण योनिभ्रष्ट, तपभ्रष्ट, त्यागभ्रष्ट होत आहे आणि त्यांतून स्वाभिमान, ईश्वरभाव हे गुण लुप्त होत आहेत. इंग्रजाला जर घालवावयाचे असेल तर शास्त्रसंपन्न ब्राह्मण तयार झाले पाहिजेत. इंग्रजांचें राज्य शास्त्रसंपन्नतेवर आहे. पण महाराष्ट्रीय ब्राह्मण शास्त्राकडे दुर्लक्ष करून स्वराज्य मिळवूं पहात आहे हे मूर्खपणाचें आहे. पल्लेदार तोफांच्या अभावीं

मराठ्यांचें राज्य गेलें, हें ध्यानांत ठेवून शास्त्रसंपन्न समाज करण्याचें काम ब्राह्मणानें केलें पाहिजे. ऋषिवर्य राजवाड्यांनी ब्राह्मणांच्या कर्तृत्वाचा, बुद्धिमत्तेचा, त्यांच्या ऋषिपरंपरेचा मोठा जाज्वल्य अभिमान होता म्हणून ते हल्लीच्या कारकून ब्राह्मणांना नीग्रो, पशू म्हणून संबोधित असत ! ब्राह्मणांनीं ब्राह्मण होऊन कायदा तयार केला पाहिजे व क्षत्रिय वर्गाचें पुनरुज्जीवन करून कायदा अमलांत आणणारी सत्ता उत्पन्न केली पाहिजे असे ते वरचेवर म्हणत असत. आणि म्हणून वेळोवेळीं श्री शिवाजी छत्रपति आणि समर्थ रामदासस्वामी यांचा उल्लेख अभिमानानें करीत. सुदैवानें या लेखकाचा आणि या विभूतीचा अलीकडे बराच परिचय झाला होता व ही विभूति एक महिना व ईस नुकतीच राहिली होती. त्यावेळीं ब्राह्मण्याबद्दलचे त्यांचे विचार ऐकावयाला मिळाले. श्रीसमर्थांनीं विशी बाविशीचे ब्राह्मण, मराठे तरुण हाताशी धरले तसेंच ब्रह्मक्षत्रांतील तरूण हाताशी घेऊन त्यांना शास्त्रसंपन्न करावें. इंग्रजाने उत्पन्न केलेलीं हजारो शास्त्रे आत्मसात् करावी आणि समाजांत शासनशास्त्र निर्माण करावें असेंच ते वरचेवर सांगत. महाराष्ट्रीय ब्राह्मण सर्वांपुढें जावा, त्यानें संघटित व्हावें व जगाला उदाहरण घालून द्यावें अशाच त्यांचा संदेश आहे. राजवाडे ऋषींची शिकवण चार सूत्रांत सांगतां येईल. **तप, त्याग, विद्या व उद्योग ही राजवाडे सांप्रदायाची चतुःसूत्री आहे.** राष्ट्राला याच चतुःसूत्रीचा अत्यन्त उपयोग आहे. तरुण पिढीनें राजवाड्यांचें जिवंत व कर्तृत्व स्मारक करावें. विशेषतः ब्राह्मणतरुणांनीं विद्यार्थि दशेंत वरील चतुःसूत्रीचें पाठ गिरवावेत आणि त्यांच्या प्रमाणें प्रौढ वयांत बहुमोल प्रचंड ग्रंथ संपत्ति निर्माण करून जगावर उपकार करावा. राजवाडे गेले म्हणजे **ब्राह्मण्याचा सूर्य** मावळला. दहा हजार वर्षांची ऋषिपरंपरा राजवाड्यांच्याकडे बोट दाखवून अचूक दाखवितां येत होती ती दाखविण्याला आज हिंदुस्थानांत एक तरी ब्राह्मण आहे काय ? तप, त्याग, विद्या, उद्योग या क्षेत्रांत व्यास, वाल्मिकी, पाणिनी, जैमिनी, विद्यारण्य यांची बरोबरी करणारा, प्रसंगीं त्यांच्या चुका काढणारा असा कोहिनूर हिरा आज हिंदुस्थाननें गमावला याबद्दल अंतःकरण भरून आल्यावाचून व डोळ्यांतून अश्रु ढाळल्यावांचून राहावत नाहीं. येवढेंच सांगून हा लेख पुरा करितो !

# गु. राजवाड्यांचें स्मरण

## ११

( लेखक:— दत्तोपंत आपटे, पुणें. )

कै० विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनीं इतिहास, व्युत्पत्ति, समाजशास्त्र वगैरे अनेक विषयांचे अध्ययन करून त्यांतले सिद्धांत आपल्या लेखांत नमूद करून ठेवले. त्यापैकीं इतिहासाच्या क्षेत्रांत त्यांनीं केलेल्या कामागीरीसंबंधीं एक दोन मुद्दे मी येथें नमूद करणार आहे. इतिहासकाराचें मुख्य कर्तव्य कोणतें यासंबधीं सध्या दोन मतें युरोपांत प्रचलित आहेत. इतिहासकारानें एखाद्या विवक्षित काळाची किंवा प्रसंगाची सीमा आंखून घेऊन त्या संबंधीची सामुग्री जमा करावी; तिची सशास्त्र मांडणी करून व पुराव्याचे नियम पाहून तिची तपासणी करावी आणि विरोध असेल तेथें आधारांचें बलाबल पाहून खरी हकीकत त्यांतून काय निष्पन्न होते त्याचें कथन करावें. याचाच अर्थ इति+ह+आस ह्मणजे ' याप्रमाणें घडलें ' हें नमूद करणें हेंच सशास्त्र इतिहासकाराचें मुख्य कर्तव्य असें कित्येक आधुनिक इतिहासकारांचें ह्मणणें आहे. पण वर सांगितलेलें काम केवळ साधनरूप असून त्यावरून ' सिद्धांत काढणें ' हें इतिहासकाराचें खरें ध्येय असावें असें दुसरे कित्येक विद्वान ह्मणतात. यावरून हें लक्षांत येईल कीं, सशास्त्र संशोधन व सिद्धांतग्रथन यापैकीं इतिहासकाराची दृष्टि मुख्यत: कशावर असावी व गौणत्व कशास द्यावें यासंबंधीं विद्वानांत मतभेद आहे. कै० राजवाडे हे सिद्धांतग्रथनाचे भोक्ते होते. इतिहास हें समाजशास्त्राचें एक अंग आहे. समाजशास्त्राच्या अध्ययनानें आपल्या समाजाचे गुणदोषविवेचन करण्यास मदत होईल; याकरितां इतिहासाच्या अध्ययनानें कोणते सिद्धांत निघतात ते पाहण्यासाटीं व त्याचें साधन ह्मणून संशोधनशास्त्राचीहि मांडणी करण्यासाटीं त्यांनीं पराकाष्टेचे परिश्रम केले. त्यांची वृत्ति स्वाभिमानाची होती; आपल्या समाजास जागें करून त्याला कार्यप्रवण करावें, त्याची सन्यस्त मनोरचना बदलून टाकावी याप्रीत्यर्थ त्यांच्या अंत:करणाची तळमळ चालली होती. या तळमळीनें त्यांना संशोधक व सिद्धांतप्रतिपादक बनविलें होते. पण केवळ शोधानें त्यांच्या मनाची तळमळ शमण्याजोगी नव्हती, अगर केवळ विद्यानंदांत तल्लिन होऊन रहावें हा त्यांचा हेतु नव्हता. महाराष्ट्रांतील समाज हाललेला व कामास लागलेला दिसावा—आणि तो आपल्या डोळ्यादेखत दिसावा—अशी त्यांची जबर इच्छा असल्यामुळें आपण आणखी ४० वर्षें जगूं व हा सुंदर देखावा पाहूं असें ते आपल्या मनास वारंवार सांगत असत. पण त्यांच्या मनास पूर्ण समाधान असें केव्हांहि वाटलें नाहीं. ते हाडाचे विद्याव्यासंगी होते; यामुळें विद्याव्यासंगांत गढून गेल्यावेळीं त्यांना आनंद

वाटत असे आणि या स्थितीचा अनुभव घेण्यांत त्यांचा पुष्कळ वेळ जाई यांत शंका नाहीं. परन्तु आपणाप्रमाणें आपल्या समाजांतहि विद्यावृद्धीसाठीं व शास्त्रसंवर्धनासाठीं अनेक लोकांनीं जोराची खटपट करावी अशीहि त्यांची उत्कट इच्छा होती; ती पुरी होण्याचें लक्षण त्यांना दिसलें नाहीं. तेव्हां या उपेक्षेबद्दल श्रीमंत व सुशिक्षित लोकांची कानउघाडणी करण्याची त्यांनीं खटपट केली. तिचाहि व्हावा तसा परिणाम झाला नाहीं. यामुळें समाज जागा होण्यास अद्याप पुष्कळ काळ लागेल हें त्यांना पटलें. व भावी काळाकडे लक्ष ठेऊन त्यांनीं आपला विद्याव्यासंग चालूं ठेवला. मात्र चालू पिढीनें दाखविलेल्या दिरंगाईमुळें चार चौघांत मिसळण्यापेक्षां ग्रंथालोचनांत काळ घालविणें त्यांना दिवसेंदिवस बरें वाटूं लागलें व वर्तमानकाळाकडे पाठ फिरवून भूतकाळाचें ज्ञान संपादन करण्याच्या कामींच त्यांनीं पराकाष्ठेचे परिश्रम केले. एकेक विषय किती वर्षे डोक्यांत घोळवावा, त्याच्या माहितीसाठीं किती पायपाट, दगदग सोसावी आणि किती पैसा खर्ची घालावा याला ते सीमा म्हणून घालीत नसत. मिळेल तितका वेळ, पडेल तितकी दगदग आणि लागेल तो पैसा पुरवून माहिती गोळा केली पाहिजे हें तत्त्व तें कठोरपणें आचरणांत आणीत; आणि अशा रीतीनें जमविलेल्या सामुग्रीच्या सहाय्यानें गतकालाचें यथार्थ स्वरूप मनापुढें आणण्यासाठीं वर्षेच्या वर्षे विचार करीत, यामुळें उपलब्ध पुराव्यावरून निघणारी अनुमानें व त्याखेरीज त्यावरून सुचणारे तपशील यांच्या मिश्रणानें गतकालाची एक स्पष्ट कल्पना त्यांच्या मनांत तयार होई; आणि ती कल्पना शब्दांत मांडून दाखवितांना त्यांच्या लेखणीस स्फुरण चढे. त्यांनीं केलेली गतकालीन वर्णनें वाचीत असतां आपण प्रत्यक्ष त्या काळांतच रहात असून त्यांत घडत असलेल्या गोष्टी पहात आहों कीं काय असा मनास ठिकठिकाणीं भास होतो. राधामाधवविलासचंपूच्या प्रस्तावनेंतली शहाजीकालीन समाजस्थितीची वर्णनें, महिकावतीच्या बखरीस जोडलेल्या प्रस्तावनेतली कोंकणांतील खेड्यांची शब्दचित्रें, ' महाराष्ट्राचा वसाहतकाल ' यांतील तपशीलवार माहिती वगैरे भाग वाचीत असतां आपण इतिहासाचा रुक्ष भाग वाचीत नसून उत्तम, सरस व सालंकृत अशा भाषेनें फुललेल्या व रम्य वाङ्मयोपवनांतील विचारसुगंधानें दरवळलेल्या उत्तम वातावरणांतून आपण चाललों आहों असें वाचकांना मनापासून वाटते. आणि वस्तुस्थिती अशी होती कीं, बहुतेक वाचक त्यांनीं प्रसिद्ध केलेली ऐतिहासिक पत्रें न वाचतां राजवाड्यांच्या प्रस्तावनाच तेवढ्या वाचीत. या प्रस्तावनांमधून कांहीं भाग शास्त्रीय स्वरूपाचा क्लिष्ट असा असला तरी जुनी व प्रचलित समाजस्थिती सूक्ष्मपणें तपासून सामान्य वाचकहि ज्यांत रमतील अशी स्वतंत्र विचारस्थळेंहि ठिकठिकाणीं असत. यामुळें त्यांचे ग्रंथ वाचण्याची हौस महाराष्ट्रभर बऱ्याच प्रमाणांत होती. साधुसंताविषयींचें विवेचन, जहागिरदार व सुशिक्षित यांची इतिहासासंबंधीची उपेक्षाबुद्धी, मोठमोठ्या विद्वानांची इंग्रजींत पत्रव्यवहार करण्याची खोड वगैरे विषय त्यांनीं इतक्या निर्भिड शब्दांत मांडले आहेत कीं त्यांतील विलक्षण निर्भिडपणाच कित्येकांना मोहक वाटल्यावाचून राहणार नाहीं.

कुशाग्रबुद्धि, निरलसपणा, जबर कल्पनाशक्ति, देशाभिमान आणि कार्यैकदृष्टि इत्यादि गुणांचें संमीलन त्यांच्या ठिकाणीं झालें असल्यामुळें महाराष्ट्राच्या इतिहास क्षेत्रांत त्यांना कायमच्या स्वरूपाची कामगिरी करतां आली. तिचें वर्णन ' **त्यांनीं महाराष्ट्राच्या इतिहासाचें गुरुस्थान महाराष्ट्रांत आहे याची जाणीव उत्पन्न केली.** ' या शब्दांत करतां येईल. राजवाड्यांचा उदय होण्यापूर्वी ग्रँडफविषयीं थोडीबहुत तक्रार सुरू होती व प्रतिक्रियारूपानें ' आमच्या पूर्वजांची निंदा करणाऱ्यापेक्षां बखरकारांचा इतिहास खरा धरला पाहिजे ' असें मत रूढ होत चाललें होतें. परन्तु हे दोघेहि अविश्वसनीय असून अस्सल कागदपत्र शोधून काढून त्या आधारावर आपल्या इतिहासाची मांडणी केली पाहिजे. ही गोष्ट कै० राजवाडे यांनीं तपशीलवार

विवेचन करून पटवून दिली. संशोधनशास्त्राच्या कसोटीस उतरणारा इतिहास लिहिला पाहिजे हें पटवून देतांना ग्रँडफच्या चुका दाखविणें त्यांना भाग पडलें; आणि त्याबरोबरच असें करण्यानें महाराष्ट्राच्या इतिहासास गुरुस्थानीं मानला गेलेल्या परकीय ग्रंथकाराची छाप अनायासें उठणार आहे या जाणिवेनें त्यांना प्रोत्साहित केलें. याशिवाय त्यांची विधायक स्वरूपाची कामगिरी ही कीं, महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्यास अत्यंत उपयोगी अशी सामुग्री महाराष्ट्रांत गांवोगांव आहे हें त्यांनीं २५।३० ग्रंथ प्रकाशित करून हजारों लोकांना दाखवून दिलें. शहाजी, शिवाजी, भाऊसाहेब, फडणीस, काळे, हिंगणे वगैरेंची अस्सल पत्रें प्रकाशित होऊं लागली तेव्हां इतिहासाच्या दृष्टीनें अशी बहुमोल रत्नें आपल्याजवळ आहेत व त्यांची जपणूक व प्रकाशन आपण मोठ्या आस्थेनें केलें पाहिजे. हें ज्ञान बऱ्याच ठिकाणीं झालें. आपल्या जवळचे जुने कागद आह्मीं दुसऱ्यास कां दाखवावे असें ह्मणणारे लोक कमी होऊन संशोधकांविषयीं आदराची भाषा वापरणाऱ्या लोकांची संख्या वाढूं लागली. प्रत्येक अस्सल कागदानें ऐतिहासिक माहितींत बहुतेक भर पडते असें पाहून महाराष्ट्राच्या ज्ञानांत भर घालण्याचें श्रेय मलाहि मिळवितां येईल असा आत्मविश्वास शहरापासून खेड्यांत राहणाऱ्या शाळामास्तरांपर्यंत सर्व विद्याव्यासंगी लोकांच्या मनांत उत्पन्न झाला. सारांश ज्ञानसंवर्धनाच्या कामांत इच्छा असेल त्याला ( कागद मिळविण्याची खटपट करून ) भागीदार होता येईल असा राजमार्ग दाखवून राजवाडे यांनीं महाराष्ट्रांतील संशोधनाची कार्यक्षमता फार विस्तृत करून ठेविली आहे. सामुग्री मिळण्याची सोय महाराष्ट्रांत, तीं पत्रें ज्या मोडी लिपींत लिहिलेली ती मोडी लिपी बालपणापासून महाराष्ट्रीयांच्या परिचयाची; त्यांतून येणाऱ्या व्यक्तींची व स्थळांची माहिती इतरांपेक्षां महाराष्ट्रीयांस सहज मिळण्याजोगी अशा रीतीची अनेक प्रकारची अनुकुलता असल्यामुळें माशास जसें पाण्यांत पोहण्याची कला जन्मसिद्ध असते तद्वत् महाराष्ट्राचा इतिहास निर्माण करण्याचें काम महाराष्ट्रीयांच्याच हातून झालें पाहिजे व होईल अशी जाणीव व कर्तव्यजागृति राजवाडे यांनीं निर्माण केली. यामुळें त्यांच्या आयुष्यांतच अलीकडे अशी परिस्थिती निर्माण झाली होती कीं, मराठ्यांच्या इतिहासासंबंधीं बोलावयाचें असल्यास ग्रँडफ, एलफिन्स्टन वगैरेंचीं मतें पाहण्यापेक्षा राजवाडे, खरे यांचेच ग्रंथ पाहिले पाहिजेत असें महाराष्ट्रभर सर्वजण ह्मणत. इतकेंच नव्हे तर महाराष्ट्राच्या इतिहासावर इंग्रजींत ग्रंथ लिहिणाऱ्या इंग्रजांना देखील महाराष्ट्रांतील विद्वानांनीं काय काय मतें प्रतिपादन केलीं आहेत तीं अभ्यासून नंतर बोलण्याचा प्रसंग प्राप्त झाला. यासच 'गुरुस्थान इंग्रजांकडे होतें तें महाराष्ट्रेतिहासापुरतें राजवाड्यांनीं महाराष्ट्रीयांकडे आणून सोडलें' असें ह्मणतां येईल. यापुढे तें इकडेच टिकविण्याची जबाबदारी त्यांनीं याबरोबरच उत्पन्न करून ठेवली आहे ती ओळखणें हें चालू पिढीतील विद्याव्यासंगी लोकांचें कर्तव्य आहे.

